# प्रकरण दुसरे

# श्री कोपेश्वर मंदिराचे स्थापत्य आणि वैशिष्ट्ये

# प्रकरण दुसरे

# श्री कोपेश्वर मंदिराचे स्थापत्य आणि वैशिष्ट्ये

## प्रस्तावना

जगभरात सर्व धर्म पंथामध्ये धार्मिक वास्तूंचे अस्तित्व दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांपैकी मंदिर स्थापत्य हे एक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक धर्मात या वास्तूला वेगवेगळी नावे असली तरी उद्देशमात्र एकच आहे, तो म्हणजे आध्यात्मिक प्रगती. पुराणे, सूत्र, अर्थशास्त्र या प्राचीन ग्रंथात मंदिरासाठी देवालय, देवतायन, देवकुल, देवग्रह असे शब्द आले आहेत. जेव्हा वास्तुशास्त्राची प्रगती झाली तेव्हा मंदिरासाठी प्रासाद हा शब्द अधिकत्तम वापरला जाऊ लागला. उत्तरेत प्रसाद तर दक्षिणेत मंदिरासाठी विमान शब्द वापरला जाऊ लागला.[१]

धार्मिक वास्तूंचे वर्गीकरण केल्यास मंदिरे किंवा देवालये ही महत्त्वपूर्ण ठरतात. देवालय म्हणजे देवाचे घर या स्वरुपातील वास्तू होय. सामान्यपणे देवाची मूर्ती यात विराजमान असते. मंदिरात नैवेद्य, मनोरंजनासाठी नृत्य–नाट्य–गायन, शेजघर या सुविधा देवासाठी केल्या जातात. पितरांच्या पुजनातून आलेला 'स्मृतीमंदिर' हा धार्मिक वास्तूंचा दुसरा प्रकार होय. इजिप्तचे पिरॅमिड, भारतातल्या स्तूप, समाध्या, छत्र्या या सर्वांचा समावेश हा स्मृतीमंदिरात होतो. तिसरा प्रकार म्हणजे सार्वजनिक 'प्रार्थनास्थान'. या ठिकाणी एकत्र प्रार्थना केली जाते. चर्च, मस्जिद यांचा समावेश तिसऱ्या प्रकारात होतो.[२]

मंदिर, स्तूप, चर्च, मस्जिद या धार्मिक वास्तूंच्या स्थापत्य शैलीतही लक्षणीय फरक असल्याचे जाणवते. हिंदूच्या धार्मिक वास्तूंमध्ये मंदिरांना अतिशय महत्त्व आहे. द्रविड, नागर, वेसर या मंदिर स्थापत्याच्या विकसित शैली आहेत.

## भारतातील मंदिर निर्मितीची सुरवात आणि विकास

प्राचीन भारतीय इतिहासात आर्यांची आक्रमणे (इ.पू. १५००) व बुद्धाचे आगमन (इ.स.पू. ५६६–इ.पू. ४८६) या कालखंडादरम्यान मंदिर अस्तित्वाचा कोणताही पुरावा

उपलब्ध होत नाही. याचा अर्थ असा होत नाही की या कालखंडात मंदिराचे अस्तित्वच नव्हते. या कालखंडात मंदिर अस्तित्वाचे पुरावे न मिळण्याचे कारण म्हणजे बांधकामासाठी वापरले जाणारे कमी टिकाऊ आणि नाशवंत माध्यम. या काळात बांबू, लाकूड, वीटा, माती यांचा वापर बांधकामासाठी केला गेला. दिल्ली, आग्रा असे अपवाद वगळता भारताच्या उत्तरेस मैदानी भागात चांगल्या प्रतीच्या दगडाचा अभाव होता. हिमालयाच्या पायथ्याशी उपलब्ध असणारा दगडही हालक्या दर्जाचा मिश्र दगड असून तो कोरीव कामासाठी अयोग्य ठरतो. तर दुसऱ्या बाजूला या प्रदेशात लाकूड मोठ्या प्रमाणात व सहज उपलब्ध होत होते. त्यामुळे या कालखंडात उपलब्ध लाकडाचा अधिक वापर केला गेला. परिणामी या कालखंडातील मंदिरे अधिक चिरस्थायी ठरु शकली नाहीत.[३] बौद्धधर्म प्रसाराच्या हेतूने भारतात सर्वप्रथम गुहामंदिरे निर्माण केली गेली. बौद्ध, जैन व शेवटी हिंदू गुहामंदिराची निर्मिती केली गेली.[४] या गुहा मंदिराबरोबरच बांधीव मंदिराचाही कालानुक्रमे विकास होत गेला.

मंदिर संकल्पनेच्या विकासातील सुरवातीचे मंदिराचे स्वरुप अतिशय साधे होते. सामान्य जमिनीपेक्षा थोड्या उंच जागी प्रतिमा स्थापन करत व त्याच्या चारही बाजूला वेदिका असत. नंतर वेदिकांवर अच्छादन टाकले जाऊ लागले. प्राचीन आहत नाण्यांवर मंदिराचे हे साधे स्वरुप पहावयास मिळते.[५] अर्थात या वास्तूचे सुरवातीचे स्वरुप साधी पर्णकुटी असेच होते. मंदिर स्थापत्य विकासाच्या पुढच्या टप्प्यात प्रत्यक्ष पुजाविधी करणाऱ्या व्यक्तींना भक्तांना एकत्र येण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली. परिणामी गर्भगृह आणि मंडप असे स्वरुप निर्माण झाले. देवाची दिनचर्याही ठरवण्यात येऊ लागली. भूपाळी म्हणून देवाला पहाटे उठवणे, नैवेद्य दाखवणे, संगीत नृत्याद्वारे करमणूक करणे हे देवाच्या दिनचर्येचेच भाग होते. या सर्व उपचारांना रंगभोग आणि अंगभोग अशी नामाभिधाने आहेत.[६] देवाच्या या दिनचर्येला सुसंगत अशा रितीने मंदिराच्या रचनेतही बदल करण्यात येऊ लागले. देवासाठी शेजघराची निर्मिती झाली. मंडप आणि गर्भग्रह यांच्यामध्ये अंतराळ कक्षाची निर्मिती होऊ लागली. तसेच

नृत्यगायनाकरता मंडपात रंगशिलेची योजना करण्यात येऊ लागली.[७] कालांतराने प्रदक्षिणापथ असलेली सांधार पद्धतीची मंदिरे बांधली जाऊ लागली.

स्थायी स्वरुपी मंदिर बांधणी मौर्य कालखंडात अस्तित्वात आली.[८] कौटिल्यानेही आपल्या अर्थशास्त्रात नगराच्या मध्यभागी अपराजिता (दुर्गा), अप्रतिहत (विष्णू), जयंत (सुब्रह्मण्य–स्कंद) वैजयन्त (इंद्र), शिव, वैभवण (कुबेर) यांची मंदिरे बांधावित असे सुचविले आहे.[९] बांधीव वास्तूमंदिराचा सर्वप्रथम पुरावा राजस्थानमधील जयपूर जिल्ह्यातील भारहूत येथे मिळाला. येथील उत्खननात मौर्य काळातील इ.पू. तिसऱ्या शतकातील मंदिर स्थापत्याचे पुरातत्त्वीय अवशेष प्राप्त झाले आहेत. या मंदिराचा व्यास ८.२३ मीटर असून या मंदिराचे बांधकाम वीटांनी केले होते. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिरात २६ लाकडी खांब होते.[१०] हे पुरावे मंदिर स्थापत्याची प्रारंभिक अवस्था विशद करतात. साध्या चौकोनी, आयाताकृती रचनेपासून ते क्लिष्ट अशा तारकाकृती रचनेपर्यंत हिंदू स्थापत्यकला उंच भरारी घेत गेली. मंदिर संकल्पनेच्या विकासाबरोबर मंदिर स्थापत्याचाही विकास होत गेला. विविध कला परंपरा, अनेक राजवटींचा राजाश्रय आणि स्थल कालानुरुप मंदिर स्थापत्याच्या वेगवेगळ्या शैलीही विकसित झाल्या. या मंदिर स्थापत्यशैली द्रविड, नागर आणि वेसर या नावाने प्रसिद्ध आहेत. तसेच तथाकथित हेमाडपंती पद्धतीचे बांधकामही केले जाऊ लागले.

## हेमाडपंती मंदिरे

प्राचीन मंदिराच्या बांधकामाचे खास वैशिष्ट्य म्हणजे चुन्याच्या सहाय्याविना किंवा कोणत्याही प्रकारचे सांधीद्रव्य न वापरता मंदिर बांधणीसाठी वेगवेगळ्या आकारात घडवलेले दगड आंतरआडक पद्धतीने एकमेकात बसवून ही मंदिरे बांधली गेली. अशा रितीने बांधलेल्या मंदिरांना हेमाडपंती मंदिरे म्हणण्याचा प्रघात आहे.

वास्तविक अशी शुष्कसांधी मंदिरे भारतात सर्वत्र आढळतात. इतर प्रांतातील अशा प्रकारच्या मंदिराप्रमाणेच महाराष्ट्रातही ह्या मंदिरांची कोणत्यातरी आख्यायिकेतील व्यक्तींशी सांगड घातली गेल्याचे आढळते. अशी सांगड घातली गेलेली व्यक्ती एकतर स्थपती तरी असते

किंवा मंदिर बांधणीचा आर्थिक भार उचलणारी आश्रयदात्री तरी असते. कर्नाटकात अशा प्रकारच्या मंदिराची सांगड जक्कणाचार्याशी घातली जाते आणि महाराष्ट्रात अशा मंदिरांना हेमाडपंती संबोधण्यात येते. बहुतांशी भारतात पसरलेल्या स्थापत्य परंपरेची सांगड कोक्कासाशी घालण्यात येते.[११] हेमाडपंत किंवा हेमाद्री हा यादव साम्राज्यात 'करणाधीप' पदावर कार्य करीत होता. हेमाद्रीने राजाश्रयाच्या जोरावर अनेक मंदिरे बांधली.[१२] खरे तर शुष्कसांधी प्रकारची मंदिरे हेमापतांच्या उदयापूर्वीही बांधली जात होती. परंतु त्याने या प्रकारच्या मंदिर बांधणी कार्याला बरेच प्रोत्साहन दिले असावे म्हणूनच कालांतराने हा मंदिर बांधणीचा प्रकार त्याच्याच नावाने ओळखला जाऊ लागला असावा.

शिलालेखांचा पुरावा अभ्यासला तर अशा प्रकारची मंदिरे ११ व्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच बांधण्यात येत होती असे दिसते. पण हेमाद्री किंवा हेमाडपंत हा १३ व्या शतकातला आहे. अर्थातच ११ व्या आणि १२ व्या शतकातील अशा प्रकारच्या शुष्कसांधी प्रस्तर मंदिरांना हेमाडपंती संबोधणे उचित ठरणार नाही.[१३]

## मंदिर स्थापत्याच्या शैली

प्राचीन भारतात मंदिराच्या नागर आणि द्रविड या दोन मुख्य शैली आढळतात. दोन शैलीतील काही घटकांच्या मिश्रणाने तिसरी वेसर शैली उदयास आली.[१४] भौगोलिकदृष्ट्या नागर शैली ही प्रामुख्याने उत्तर भारतात म्हणजेच हिमालय पर्वत ते विंध्य पर्वतापर्यंतच्या प्रदेशात आढळते. द्रविड शैली ही दक्षिण भारतात कृष्णा नदी ते केप केमोरीन पर्यंतच्या प्रदेशात दिसून येते. तर वेसन शैली मध्य भारतात विंध्य पर्वत ते कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशात प्रामुख्याने आढळते.[१५] उपरोल्लेखित तीन शैली जरी तत्कालीन भारत वर्षात सर्व स्थपतींना ज्ञात असल्या तरी फक्त द्रविड शैलीतील स्थपतींनी दक्षिणेत नागर शैलीचा काही ठिकाणी समावेश केल्याचे आढळून येते. उत्तर भारतात कोणतेही प्राचीन मंदिर द्रविड शैलीत बांधले गेल्याचे आढळणार नाही.[१६] नागर शैलीचे मुख्य आचार्य शंभु, गर्ग, अत्रि, वसिष्ठ, पराशर, वृहद्रथ, विश्वकर्मा व वासुदेव मानले जातात. दक्षिण परंपरेच्या द्रविड शैलीचे आचार्य ब्रह्मा, मय, मातंग, भृगू हे

होते.[१७] नागर आणि द्रविड या दोन शैलीमधील फरक अभ्यासताना एक गोष्ट सहज जाणवते ती अशी की नागर मंदिर शैलीत वास्तू खूप उंच दिसावी असा प्रयत्न केला जातो. तर द्रविड मंदिरात विस्ताराला महत्त्व मिळाले आहे. एकात 'उर्ध्ववृत्ती' (vertical elements) तर दुसऱ्यात 'समतल वृत्ती' (Horizontal elements) दिसते.[१८] द्रविड शिखर तुलनेने कमी उंचीचे असते. यात पूर्ण शिखराच्या उंचीऐवजी, प्रत्येक मजल्याच्या पृथक आविष्काराला महत्त्व दिले आहे. याउलट नागर शैलीतील मंदिरात वरवर झेपावत जाण्याची प्रवृत्ती प्रकर्षाने जाणवते. याला अनुसरुनच भिंतीची रचना करुन छायाप्रकाराचे उभे पट्ट निर्माण करतात.[१९] नागर आणि द्रविड शैलीच्या शिखरामध्ये काही प्रमुख दिसून येतात.

**नागर शैलीच्या शिखरामधील प्रमुख लक्षणे/अंगे पुढीलप्रमाणे –**

**मूलमंजिरी** (मुख्य शिखर), एकावर एक निमुळती होत जाणारी जाड कडी रचल्यासारखी ठेवण, **लता** किंवा लतिना, शिखराच्या चारही बाजूस मध्यावर निमुळत्या होत जाणाऱ्या पट्ट्या, **उरोमंजिरी**,–उपशिखर अथवा मूळ शिखराची लहान प्रतिकृती, उरुशृंग– शिखराच्या चारही बाजूस वर निमुळती होत जाणारी छोट्या शिखराची मालिका, शुकनास किंवा **नासी**.–मंदिर प्रवेशद्वाराच्या दिशेस असणारी, पोपटाच्या चोचीसारखी गवाक्षाकृती, **स्कंध**–शिखर जिथे संपते ती बाजू, **गल**–दंडगोल (मानवी गळ्यासदृश्य भाग) **आमलक** – आवळ्यासारखा भाग, **कलश** ही नागर शैलीतील प्रमुख लक्षणे आहेत.[२०]

**द्रविड शैलीच्या शिखरामधील प्रमुख लक्षणे अंगे –**

**वेदी** – शिखराला उचलून धरणारा भाग, **तल**–एकावर एक निमुळते होत जाणारे मजले, हारान्तर, प्रत्येक तलावर भोवतीने असणारी शिखरांची मालिका, **शाला**–हारान्तराच्या मध्ये असणारे अर्धगोलाकृती आडवे शिखर, **कूट**–हारान्तराच्या चार टोकास चार वेगळ्या धाटणीची लहान तलयुक्त शिखरे, **अल्प** अथवा **क्षूद्रविमान**– सर्वात शेवटी स्कंधरेनेवरील एक मजला व त्यावर अष्टकोनी किंवा षट्कोनी शिखर, त्यावर **स्तूपी** आणि कुंभाची मालिका वा नुसता **कुंभ** ही द्रविड शैलीतील प्रमुख लक्षणे आहेत.[२१]

### भूमिज मंदिरे

खिद्रापूरचे श्री कोपेश्वर मंदिर हे भूमिज शैलीत बांधलेले आहे. भूमिज शैली ही नागर शैलीची उपशैली असून माळवा भागात भूमिज नागर शैली विकसित झाली. त्याचबरोबर राजस्थान, महाराष्ट्र व गुजरात भागातही ती जाऊन पोहचली. दहाव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत भूमीज शैलीने आपले वेगळेपण टिकवून ठेवले. माळव्याच्या परमार व महाराष्ट्राच्या यादव या राजवंशाच्या आश्रयाने या शाखेचा परिपोष झाला. यामुळे स्थलपरत्वे वा व्यक्तिपरत्वे या शाखेला मालव–परमार वा यादव असेही संबोधतात. आज महाराष्ट्रातील भूमिज मंदिरात अंबरनाथ (ठाणे), बलसाणे (धुळे), सिन्नर व झोडगे (नाशिक) ही विशेष उल्लेखनीय मंदिरे आहेत.[२२] तसेच या सर्व मंदिरामध्ये खिद्रापूर येथील श्री. कोपेश्वर मंदिराचाही समावेश होतो. कोपेश्वर मंदिराच्या गर्भगृहाच्या कपोतालीवर मुख्य शिखरांची प्रतिकृती असलेल्या छोट्या शिखरांची मेखला आहे. कपोतालीवर असलेली मुख्य शिखरांची प्रतिकृती व देवकोष्ठांवरील शिखरे यावरुन मुळात हे शिखर सत्परथ भूमीज, शैलीतील असावे हे उघड आहे.[२३]

### भूमिज शैलीची वैशिष्ट्ये

भूमिज शैलीत लता, सुरसेनक व कुटस्तंभाची विशिष्ट पद्धतीने रचना केलेली असते. भूमिज मंदिरे ही निरंधार असतात. भूमिज शिखर शैलीतील वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

**१) लता –** भूमिज शिखराच्या चारही दिशेला मध्यभागी लता किंवा मूलमंजिरी नावाची पट्टी असते. ही मूलमंजिरी शिखराच्या सुरवातीपासून अमलकापर्यंत असते.

**२) शूरसेनक –** लतांच्या पायथ्याशी चैत्य गवाक्षाप्रमाणे एक गोल कमान असते त्याला शूरसेनक म्हणतात. यात एक मुखवटा कोरलेला असतो. मंदिराच्या समोरील लतेवरील शूरसेनक उंच नेलेला असतो याला शुकनासिका म्हणतात.

**३) कुटस्तंभ –** भूमिज शिखरात कुटस्तंभाची एकावर एक अशी रचना केलेली असते. मूळ शिखराची लहान प्रतिकृती व लहान स्तंभ म्हणजेच कुटस्तंभ होय. दोन लतांच्यामध्ये हे

कुटस्तंभ असतात. दोन लतांमध्ये कुटस्तंभाच्या उभ्या पाच ते सात ओळी असतात व आडव्या तीन ते पाच पट्ट्या असतात.

कोपेश्वर मंदिराचे मूळ शिखर अस्तित्वात नसल्याने शुरसेनक लता आपण पाहू शकत नाही. पण कपोतावर कुटस्तंभाची श्रृंखला आपण पाहू शकतो. यावरुन या भूमिज शिखरांचा अंदाज बांधू शकतो.

## श्री कोपेश्वर मंदिराचे प्रमुख विभाग

श्री कोपेश्वर मंदिराची लांबी १०३' ६'' व रुंदी ६५' इतकी आहे. तर मंदिराची विद्यमान शिखरासह उंची ५२'६'' इतकी आहे.[२४] कोपेश्वर मंदिराचे प्रामुख्याने चार विभाग पडतात ते खालीलप्रमाणे –

१) नगारखाना

२) स्वर्ग मंडप (मुखमंडप)

३) सभामंडप (गुढमंडप)

४) अंतराळ कक्ष

५) गर्भगृह

कोपेश्वर मंदिरात गर्भग्रह, अंतराळकक्ष, सभामंडप व स्वर्गमंडप यांच्या एकत्र असण्याने मंदिराला विस्तृत स्वरुप प्राप्त झाले आहे.

### १) नगारखाना

श्री कोपेश्वर मंदिराच्या आवारात प्रवेश करताना प्रथम नगारखाना लागतो. नगारखान्याच्या ललाटबिंबावर गणेशाची प्रतिमा कोरलेली आहे. तसेच नगारखान्यात विष्णूची एक प्रतिमा आहे व एक विरगळही आहे. नगारखान्याच्या भींतीवर व्याल कोरलेले आहेत. नगारखान्याचे बांधकाम नंतरच्या काळात केल्याचे स्पष्ट होते. कारण हे बांधकाम चुन्यामध्ये केलेले आढळून येते. नगारखान्याला लागून उजव्या हाताकडे पायऱ्या असून या पायऱ्यावरुन नगारखान्याच्या इमारतीवर जाता येते.

## २) स्वर्गमंडप (मुखमंडप)

नगारखान्यातून आत प्रवेश केल्यानंतर समोर दिसतो तो कोपेश्वर मंदिराचा मुखमंडप. हा मुखमंडप स्थानिक भाषेत स्वर्गमंडप या नावाने ओळखला जातो. कारण स्वर्गमंडप छत विरहित असून या मंडपात उभे राहून छताकडे पाहिल्यास आकाश दर्शन होते. स्वर्गमंडप मुख्य मंदिरापासून वेगळा बांधलेला आहे. त्या स्वर्ग मंडपाची बांधणी गोलाकार आहे. त्याचा व्यास ३६ फूट आहे. स्वर्ग मंडपाच्या बरोबर मध्यभागी १४ फूट व्यासाची एक अखंड गोल शिला आहे. ही शिला 'रंगशिला' या नावाने ओळखली जाते. स्वर्ग मंडपात एकूण ४८ स्तंभ असून १२ स्तंभ रंगशिलेभोवती आहेत. प्रसिद्ध इतिहासकार प्रा. के.जी. कुंदनगार यांनी कोपेश्वर मंदिरातील स्वर्गमंडपाची तुलना बेळगावमधील कमल बस्तीशी[२५] केली आहे. ते लिहितात की, कमल बस्तीतील मुखमंडपाची रचना कोपेश्वर मंदिरातील मंडपाशी साम्य दर्शवणारी आहे. फक्त घुमटाचे छत याला अपवाद आहे. पुढे ते लिहितात की, छत नसणाऱ्या या मंडपाच्या (स्वर्गमंडपाच्या) स्तंभाच्या हस्तावर (ब्रॅकेटस्वर) अष्ट दिक्पालांच्या मूर्ती बसवलेल्या आहेत.[२६]

कोपेश्वर मंदिरातील स्वर्ग मंडपाविषयी लिहिताना टी.एल. कळसेकर लिहितात की, 'स्वर्ग मंडपाच्या आकाश गवाक्षाला वास्तूशास्त्राचे काही नियम बसवून एक चमत्कार घडवला आहे. प्रत्येक चैत्र मासाच्या प्रतिपदेला स्वर्ग मंडपाच्या या आकाश गवाक्षातून सूर्याची कोवळी किरणे निघून थेट कोपेश्वराच्या शिवपिंडीवर अभिषेक करतात.[२७] पण कोपेश्वर मंदिरात होणारा हा किरणोत्सव चैत्र प्रतिपदेला नव्हे तर मे महिन्यात साधारण पाच ते सात तारखेच्या दरम्यान होत असतो. [२८]

कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मी मंदिरातही किरणोत्सव होतो. महालक्ष्मी मंदिरामध्ये जाने ३१, फेब्रु १, २ व नोव्हें ९, १०,११ या तारखांना दिवशी पश्चिमाभिमुख महालक्ष्मीच्या गाभाऱ्यात सूर्याची सायं किरणे प्रत्यक्ष महालक्ष्मीच्या मूर्तीवर पडतात. त्याचप्रमाणे पूर्वाभिमुख श्री

कोपेश्वर मंदिरात ५, ६ व ७ मे रोजी सुर्योदयाची कोवळी किरणे गाभाऱ्यात येतात. ही किरणे विष्णूरुप मानलेल्या धोपेश्वरावर आणि कोपेश्वर शिवलिंगावर पडतात.

कोपेश्वर मंदिराच्या स्वर्गमंडपाप्रमाणे पाटणा, संगमेश्वर (जि.जळगाव), लोणार, सातगाव, भुसारी (जि. बुलढाणा) येथील मंदिरांनाही स्वर्गमंडप असल्याचे आढळतात.[२९] गुजरातमधील मोधेराच्या सूर्य मंदिरातही कोपेश्वर मंदिराच्या स्वर्गमंडपाप्रमाणे उघडे छत असलेला मंडप आहे.[३०] पण कोपेश्वर मंदिराच्या स्वर्गमंडपाचे सौंदर्य अतुलनीय असेच आहे.

**३) सभामंडप (गुढमंडप)**

स्वर्गमंडप ओलांडून आत गेल्यानंतर मोठा सभामंडप लागतो याच्या चारही बाजूंना भिंती असल्याने स्थापत्यशास्त्राच्या परिभाषेत याला झाकलेला म्हणजेच 'गुढमंडप' असे म्हणतात.[३१]

सभामंडप हा ५० × ५० चा पूर्ण चौरसाकृती मंडप आहे. या सभामंडपाच्या मध्यभागी वर्तुळाकार रंगशिला आहे. सभामंडपातील या रंगशिलेभोवती चौरसकृतीत १२ खांब आहेत. या चौरसाकृतीच्या बाहेर २० खांब आहेत. त्यानंतर भिंतीत २८ अर्धस्तंभ आहेत. सभा मंडपातील खांबाची एकूण संख्या ६० आहे. सभा मंडपाला तीन प्रवेशद्वारे आहेत. पहिले मुख्य प्रवेशद्वार स्वर्ग मंडपालगत पूर्व दिशेस आहे. दुसरी दोन प्रवेशद्वारे दक्षिण व उत्तर दिशेला आहेत. सभामंडपात ३ वेगवेगळ्या पद्धतीचे स्तंभ पहावयास मिळतात.

सभा मंडपाच्या दक्षिण व उत्तर बाजूच्या प्रवेशद्वारालगत आणखी एक एक मंडप बांधण्याची योजना कोपेश्वर मंदिर बांधणाऱ्या स्थपितीची असावी असे वाटते. कारण प्रवेशद्वारालगत दक्षिण व उत्तर बाजूला मंडपाच्या जोत्याचे काम काही प्रमाणामध्ये केल्याचे दिसून येते. पण पुढे या मंडपाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. हे मंडप अर्धखुले मंडप अथवा कक्षासन या स्वरुपात बांधायची योजना असावी.

16807
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**४) अंतराळकक्ष**

गर्भगृह ते सभामंडप यांच्यामध्ये असलेला बंदिस्त भाग म्हणजे अंतराळ कक्ष. सभा मंडपातून आपण जसे जसे आत जाऊ तसतसा अंधार वाढत जातो. कारण अंतराळ कक्ष व गर्भगृहास एकही गवाक्ष नाही. अंतराळ कक्षाची लांबी–रुंदी २० ×२० इतकी आहे.[३२] अंतराळ कक्षाच्या डाव्या व उजव्या बाजूला दोन शैव द्‌वारपाल आहेत. त्यापैकी एक दक्षिण दिशेचा द्‌वारपाल तुटलेल्या अवस्थेत दक्षिण दरवाजाच्या बाहेर आहे. तर उत्तर दिशेला असणारा द्वारपाल अंतराळ कक्षाच्या बाहेर उभा आहे. अंतराळ कक्षात उत्तर भिंतीवर शिलालेख असून हा शिलालेख कन्नड भाषा व लिपीत कोरलेला आहे.

**५) गर्भगृह**

कोपेश्वर मंदिराचे गर्भगृह एकदल पद्धतीचे असून गर्भगृहात शिवलिंग (श्री कोपेश्वर) आणि स्थानिक भाषेत श्री. धोपेश्वर नावाने ओळखले जाणारे लिंग आहे. स्थानिक लोक श्री. धोपेश्वरास विष्णूचे प्रतिक मानतात. महत्त्वाचे म्हणजे विष्णूची प्रतिकात्मक पूजा शाळीग्राम रुपात केली जाते. पण लिंगरुपात केली जाणारी विष्णूची पूजा हे कोपेश्वर मंदिराचे वैशिष्ट्य आहे. मध्ययुगीन कालखंडात शैव–वैष्णव पंथामध्ये असलेला संघर्ष दूर व्हावा या हेतूने गर्भगृहात शिव व विष्णूची प्रतिके स्थापन केली असावीत. त्यामुळे शैववैष्णव पंथातील सामंजस्याची ही प्रतिके ठरतात.

कोपेश्वर मंदिराच्या गर्भगृहात असणारे शिवलिंग व विष्णूलिंग वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. शिवलिंगामध्ये शाळुंखा व लिंग भिन्न दगडातील असून शाळुंखेचा दगड काळा आहे तर लिंग हे तांबूस रंगाचे आहे. विष्णूलिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लिंगाची रचना गोल सरळ साध्या स्तंभाप्रमाणे आहे.

कोल्हापूर पुराभिलेखागारमध्ये कोपेश्वर मंदिराविषयी माहिती असलेली मोडी कागदपत्र उपलब्ध झाली आहेत. १७ जुलै १८७९ मध्ये नरसो गणेश आऊंधे यांनी कोपेश्वर मंदिरास भेट देऊन मंदिराविषयी माहिती मिळविली. ही माहिती त्यांनी मोडी लिपीमध्ये लिहून ठेवली आहे.

या कागदपत्रात मंदिराची सामान्य माहिती आलेली आहे. याशिवाय मंदिरातील शिवलिंग व विष्णूलिंगाची मोजमापे त्यांनी दिली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

''श्री कोपेश्वराचे दगडी शाळुंखा ४११ तसू[३३] उंची उत्तरेकडे व त्या शाळुंखात बाण सुमारे ४ रुंद तसू व उंची साडेपाच तसूची आहे. देवाचे मुख्य पूर्वेकडे आहे. लगत पूर्व अंगास एक वितीवर धोपेश्वर नावाचे लिंग जमीनीपासून एक हात उंच व जाडी सव्वा हात दगडी आहे.''[३४]

प्रत्यक्ष शिवलिंगाची व विष्णूलिंगाची मोजमापे मंदिराचे पुजारी श्री गणेश जोशी यांच्या मदतीने घेतली. तेव्हा पुढील माहिती हाती आली.

१) शिवलिंग – शाळुंखेची उंची ५.२ इंच व शाळुंखेतील लिंगाची उंची ५ १/२ इंच आहे. लिंगाची जाडी २४ इंच आहे. शाळुंखेची दक्षिण उत्तर लांबी ४२ इंच आहे. तर शाळुंखेचा व्यास १४ इंच आहे.

२) विष्णूलिंग (धोपेश्वर) – विष्णूलिंगाची पूर्ण उंची २४ १/२ इंच आहे तर जाडी २९ इंच आहे.

मोडी कागदपत्रात शाळुंखेची उंची ४ १/२ तसू दिलेली आहे. पण प्रत्यक्षात ती ५.२ इतकी आढळून आली. याचा अर्थ १८७९ मध्ये शिवलिंगाभोवती सध्याच्या तुलनेत अधिक उंच (०.७ इंच) फरशी असावी. सध्या शिवलिंग व विष्णूलिंगाभोवती पांढऱ्या रंगाच्या टाइल्स लावलेल्या आहेत. मोडी कागदपत्रात दिलेली शिवलिंगाची व विष्णूलिंगाची इतर मापे ही सारखीच असल्याचे आढळून आले.

शिवलिंगाची प्रणाल नेहमी उत्तरेकडे असते. पण कोपेश्वर मंदिरातील शिवलिंग तंतोतंत उत्तर दिशा दर्शवत नाही. शिवाजी विद्यापीठातील स.प्रा.डॉ.डी.एच.पवार यांच्या सोबत शिवलिंगाचे चुंबक सूचीच्या आधारे निरीक्षण केले असता असे दिसून आले की हे शिवलिंग तंतोतंत उत्तर दिशा दर्शवत नाही तर शिवलिंगाची प्रणाल १०° ने पश्चिमेकडे झुकल्याचे आढळले.

गर्भगृहातच गर्भगृहातून प्रवेश असलेली तीन देवकोष्ठ आहेत. देवकोष्ठांच्या दोन्ही बाजूला अर्धस्तंभ असून प्रतिहार जोडीही आहे. या देवकोष्ठात त्याकाळी निश्चितच कोणत्या तरी देवमूर्ती असल्या पाहिजेत.

सदर निरीक्षणाच्या आधारे अशी शक्यता वाटते की, मंदिराची मोडतोड झाली, त्यावेळी गाभाऱ्यातील शिवलिंगाला हानी पोहचली असणार. नंतर स्थापन केलेल्या शिवलिंगाची दिशा निश्चिती केवळ सूर्याच्या अनुशंगाने केली असणार. कदाचित त्यामुळेच गाभाऱ्यातील शिवलिंग तंतोतंत उत्तर दिशा न दर्शवता १०° ने पश्चिमेकडे झुकलेले आढळते.

अभिषेक जल गाभाऱ्यातून बाहेर जाण्यासाठी अंतर्गत व्यवस्था आहे. हे अभिषेक जल गर्भगृहाच्या उत्तर दिशेला असणाऱ्या मकरमुखातून तारकाकुंडात पडते. गर्भगृहात १५ स्त्रीशिल्पे व ३ पुरुष शिल्पे आहेत. या शिल्पांचे हात व चेहरे तुटलेले असले तरी वेगवेगळ्या अलंकारांनी अलंकृत असलेल्या या शिल्पातील सौंदर्य आजही जाणवते.

## श्री कोपेश्वर मंदिर स्थापत्यातील प्रमुख अंगे

### १) अधिष्ठान

मंदिर वास्तू ही पीठ किंवा अधिष्ठानावर उभी असते. मंदिराचे हे अधिष्ठान अनेक थरांनी बनलेले असते. याचे पहिले उदाहरण म्हणजे अंबरनाथ आणि बलसाने येथील मंदिरे येथे अधिष्ठानावर पारंपारिक पद्धतीचे गजथर, नरथर, अश्वथर पहावयास मिळतात. पुढील काळात मंदिर बांधणीतील ही पश्चिम भारतीय वैशिष्ट्ये कमी होऊ लागली. plane moulding किंवा सपाट पट्टी, Cyma किंवा कुमुद आणि कणी आकार अशा वेगवेगळ्या आकारांचा समावेश अधिष्ठानात होऊ लागला. [३५]

श्री. कोपेश्वर मंदिराच्या अधिष्ठानाची उंची दीड मीटर इतकी आहे. श्री कोपेश्वर मंदिराचे अधिष्ठान हे महाराष्ट्रातील इतर मंदिराच्या अधिष्ठानापेक्षा निश्चित वेगळे आहे. अधिष्ठानास सुरवातीला खुर, पद्म (Cyma reversa) व पुन्हा पद्म (here cyma recta) असे थर आहेत. या थरामुळे याच्यानंतर असणाऱ्या गजथरासाठी पाया तयार झाला आहे. गजथरातील

हत्तींची संख्या ९२ असून या हत्तींनी मंदिराचा सर्व डोलारा सावरला आहे असे भासमान होते. ९२ हत्तींच्या या गजथरानंतर गाभाऱ्याच्या उत्तर, पश्चिम व दक्षिण दिशेला लहानशा मंदिराप्रमाणे असणारी तीन देवकोष्ट आहेत. गजथरामध्ये देवकोष्ठाच्या बरोबर खाली नंदीवर आरुढ उमा महेश्वराचे शिल्प आहे. अशा प्रकारची अधिष्ठानाची रचना दुर्मिळ असून ही रचना जगप्रसिद्ध वेरुळच्या कैलाशलेण्याची प्रतिकृती असण्याची शक्यता वाटते.[३६] प्रत्येक दोन हत्तींच्यामध्ये देवी, देवता व सुरसुंदरींची शिल्पे आहेत. या प्रत्येक शिल्पासाठी स्वतंत्र पाया किंवा बैठकीची योजना केली आहे. गजथरातील हत्तींच्या पाठीवरही वेगवेगळ्या देवीदेवता आसनस्थ आहेत. गजथरावरती अधिष्ठानाची रचना छताप्रमाणे केली आहे. याला छादन म्हणण्यास हरकत नाही. ज्यामुळे गजथराचे रक्षण होते शिवाय अधिष्ठानाची सीमारेषाही निश्चित होते.

## २) मंडोवर

अधिष्ठानाच्यावर मंदिराच्या बाह्य भिंतीचा मुख्य भाग येतो जो स्थापत्यशास्त्रीय भाषेमध्ये 'मंडोवर' नावाने ओळखला जातो. मंडोवरावर शिव, विष्णू, ब्रह्मा, महिषासूरमर्दिनी, लक्ष्मी, सरस्वती, गणेश, कार्तिकेय, अष्टदिक्पाल यांची शिल्पे प्रामुख्याने कोरली आहेत. याशिवाय द्रौपदी–भीम संवाद, राम–हनुमान भेट, सीता–हनुमान भेटी असे रामायण व महाभारतातील काही प्रसंगही मंडोवरावर शिल्पित केलेले आहेत.

कोपेश्वर मंदिरामध्ये अर्धस्तंभाकृतींची सलग एकत्र रचना करुन मंदिराच्या भिंती निर्माण केल्या आहेत. उत्कृष्ट कोरीवकाम आणि शिल्पकामाने युक्त अशा उभ्या अर्धस्तंभाकृतीमध्ये मंडोवर विभाजित झालेले दिसून येते. या अर्धस्तंभाकृतीच्या या विशिष्ट रचनेमुळेच श्री कोपेश्वर मंदिराच्या तलविन्यासाला तारकाकृती स्वरुप प्राप्त झाले आहे.[३७] मंदिराच्या मंडोवरानंतर कपोताचा भाग असून या कपोतावर लहान–लहान शिखरांची मेखला दिसून येते.

## ३) छत/वितान

अत्यंत उत्कृष्ठ कोरीव काम असलेली छते माऊंट अबू येथील दिलवारा मंदिर आणि विमल शाह मंदिरात पहायला मिळतात.[३८]

अपराजितपृच्छा १८९.४ मध्ये वितानाचे तीन प्रकार दिले आहेत.

१) समतल वितान २) क्षिप्त वितान ३) उत्क्षिप्त वितान. जेथे नक्षिला उठावदारपणा नसतो ते समतल वितान. जेथे नक्षी खोदून केलेली असते ते क्षिप्त वितान व जेथे नक्षिला बाहेर उठाव असतो पद्म वगैरे नक्षी लटकती असते ते उक्षिप्त वितान होय.[३९] खिद्रापूरच्या सभामंडपाचे छत उक्षिप्त वितान प्रकारचे आहे. सभामंडपाचे छत हे सोळंकी शैलीच्या करोटक पद्धतीशी [४०] साम्य असलेले आहे. कोपेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या छतामध्ये एकात एक आत व्यास कमी होत जाणारी वर्तुळे आहेत. प्रत्येक वर्तुळ मजल्यासारखे आहे. मध्यभागी उमललेल्या फुलाची नक्षी आहे. पण ही फुलाची नक्षी प्रतलापासून फार बाहेर आलेली नाही. तसेच वितानाच्या नक्षीमध्ये ठराविक अंतरावर 'उत्तरा' (शिल्प आधारक) बाहेर आलेल्या आहेत.

## ४) स्तंभ

मंदिरामध्ये स्तंभाची निर्मिती ही छताला आधार देण्याच्या उद्देशाने केलेली असते. स्तंभाचे दोन प्रकार आहेत. १) चौकोनी स्तंभ आणि २) गोलाकार स्तंभ. दोन्ही स्तंभ वेगवेगळ्या कारणासाठी वापरले जातात. त्यावरील नक्षीकामही वेगवेगळी असते. चौकोनी स्तंभ सामान्यपणे मंडपाच्या मध्यभागी असणाऱ्या चतुष्किसाठी वापरले जातात.[४१] श्री कोपेश्वर मंदिरातही रंगशिलेच्या भोवती निर्माण होणाऱ्या चतुष्कीसाठी चौकोनी स्तंभरचना वापरली आहे. आधारक, स्तंभ, मालास्थानक, नासी किंवा उद्‌गमासह लशुन, घट, शिरावटी, मंडी, फलक अशी सभामंडपातील स्तंभाची रचना आहे. या स्तंभाच्या मालास्थानकावर किर्तिमुख, रामायणातील प्रसंग तसेच इतर शिल्पे कोरलेली आहेत. स्वर्ग मंडपातीत स्तंभाची रचना गोलाकार असून स्तंभाच्या आधारक भागावर सुरसुंदरीची शिल्पे कोरलेली आहेत.

## ५) द्‌वारशाखा

सभा मंडपाच्या उत्तर, पूर्व व दक्षिण बाजूस तीन प्रवेशद्वारे असून तीनही दरवाजाच्या द्‌वारशाखा उत्तम रितीने सजवलेल्या आहेत. द्वारशाखेचे प्रमुख तीन भाग आहेत.

१) उत्तरांग (ललाटबिंब व त्यावरील भाग)

२) उदुंबरा (उंबरठा)

३) शाखा [४२]

शाखांच्या संख्येवरुनच त्यांची नावेही निश्चित केली आहेत. उदा.

१) उत्तमशाखा : नवशाखा – पद्मिनी सप्तशाखा–हस्तिनी, पंचशाखा–नंदिनी.

२) जेष्ठशाखा : अष्ठशाखा – मुकुली, षटशाखा – मालिनी.

३) मध्यमशाखा : चतु:शाखा – गांधारी, त्रिशाखा – सुभगा

४) कनिष्ठ – द्विशाखा : सुप्रभा, एकशाखा – स्मरकीर्तित [४३]

श्री कोपश्वर मंदिराच्या उत्तर प्रवेशद्वारासाठी, दक्षिण व पूर्व प्रवेशद्वारासाठी नंदिनी या उत्तम शाखेचा वापर करण्यात आला आहे.

**उत्तर द्वारशाखा**

उत्तर द्वारशाखा ही पंचद्वारशाखा पद्धतीची आहे. द्वारशाखेवर सर्वात खाली व्याळ प्राण्यांचे अंकण केले आहे. यामध्ये सिंहव्याळ, शुकव्याळ, गजव्याळ यांचा समावेश होतो. त्यानंतर दोन्ही बाजूला पाच–पाच द्वारपालांचे शिल्पांकन केले आहे. या द्वारपालांच्या हातात पुजासाहित्य आहे. द्वारशाखेच्या उत्तरांगावर लहान–लहान पाच शिखरांची प्रतिकृती आहे.

**दक्षिण द्वारशाखा**

उत्तर द्वारशाखेप्रमाणे दक्षिण द्वारशाखा ही देखील पंचद्वार शाखा पद्धतीची आहे. द्वारशाखेवर चार द्वारपालिका आणि एक द्वारपाल शिल्पित केला आहे. हे सर्व सालंकृत असून हातात फळे, फुले असे पुजासहित्य आहे. द्वारपालांच्या खाली व्याळांचे शिल्पपट्ट दोन्ही बाजूला आहे. उत्तरांगावर पाच लहान शिखरे असून दक्षिण द्वारशाखेच्या ललाटबिंबावर श्री गणेश मूर्ती कोरली आहे.

**पूर्व द्वारशाखा**

पूर्व द्वारशाखा ही पंचद्वारशाखा पद्धतीची असून त्यापैकी एक व्याळशाखा आहे. तर ४ स्तंभशाखा आहेत. द्वारशाखेवर द्वारपाल असून त्यांच्या हातात पूजासाहित्य आहे. द्वारशाखेच्या उत्तरांगावर पाच लहान शिखरांची प्रतिकृती आहे. ललाटबिंबावर गजलक्ष्मी आहे.

अशा रितीने कोपेश्वर मंदिरातील द्वारशाखा द्वारपाल आणि व्याळ यांच्या शिल्पांकनाने अलंकृत केल्या आहेत.

**७) जालवातायन**

मंदिरात स्वच्छ हवा येण्यासाठी आणि सूर्यप्रकाश येण्यासाठी जालवातायनांची निर्मिती केलेली असते. हवा व प्रकाश या दोन मुख्य उद्देशाने जालवातायनांची निर्मिती केली गेली. पण पुढे ज्याप्रमाणे मंदिर स्थापत्यकलेचा विकास होत गेला. त्याप्रमाणे साध्या जालवातायनांच्या ऐवजी नक्षीकामाने सजलेली अलंकृत जालवातायने निर्माण केली जाऊ लागली. जालवातायने ही जाली, जालका, जाल आणि वातायन (वात–हवा आणि आयाळ–मोकळी जागा, रस्ता) या नावानेही ओळखली जातात. [४४]

**१) पूर्वेकडील जालवातायने –**

पूर्व प्रवेशद्वाराच्या उत्तर आणि दक्षिण बाजूस ही जालवातायने आहेत. दक्षिण जालवातायनावरती दाढी असलेली नमस्कार मुद्रेतील एक मूर्ती कोरली आहे. ती समपदात उभी आहे. उत्तरेकडील जालवातायनावरती मकरमुख कोरले आहे.

**२) दक्षिणेकडील जालवातायने –**

सभा मंडपाच्या दक्षिणेच्या प्रवेशद्वारालगत दक्षिण प्रवेशद्वाराच्या पूर्व व पश्चिम दिशेस ही जालवातायने आहेत. पश्चिम जालवातायनाच्या मध्यभागी सिंहमुख आहे. तसेच यज्ञोपवित घातलेली अभयमुद्रा व पद्मासनात असलेली एक योग्याची मूर्ती आहे. पूर्व जालवातायनावर घोड्यावर बसलेल्या व्यक्तीचे चित्र अंकित केले आहे.

### ३) उत्तरेकडील जालवातायने –

सभा मंडपाच्या उत्तर प्रवेशद्वारालगत उत्तर प्रवेशद्वाराच्या पूर्व पश्चिम दिशेस दोन जालवातायने आहेत. प्रवेशद्वाराच्या पूर्वेस असणाऱ्या जालवातायनावर गजलक्ष्मी आहे. ती पद्मासनात बसलेली आहे. प्रवेशद्वाराच्या पश्चिमेस असलेल्या जालवातायनाच्या मध्यभागी एका देवीची मूर्ती कोरली आहे. ती पद्मासनात बसलेली आहे. उजवा हात अभयमुद्रेत असून डाव्या हातात फळ आहे.

### ८) शिखर

'शिखर' या शब्दाचा अर्थ पर्वताचे सर्वात उंच टोक हा होतो. मंदिरामध्ये शिखराची रचना मेरु पर्वताचे प्रतिक या दृष्टीने केलेले असते.[४५] शिखरावर असणारा कळस हा मंदिराचा सर्वोच्च बिंदू असतो. शिखरावरील कळस आणि गर्भगृहातील देवता हे नेहमीच एका सरळ उभ्या रेषेत असतात.[४६] सध्या श्री कोपेश्वर मंदिरावर असणारे शिखर शंकाकृती असून त्यावर चुन्याचा गिलावा देण्यात आला आहे. सध्या दिसणारे हे शिखर निश्चितपणे मराठा काळाच्याही नंतर बांधण्यात आले आहे. गर्भगृहाच्या कपोतावर मुख्य शिखराची प्रतिकृती असलेल्या शिखरांची मेखला आहे. सध्या दिसणारे शिखर बांधताना ते या प्रतिकृतीनुसार बांधता आले असते. पण हे शिखर बांधणाऱ्या स्थपतींने तसे केले नाही. यावरुन त्याला शिल्पग्रंथाचे ज्ञान नव्हते असे मत अ.प्र. जामखेडकर यांनी व्यक्त केले आहे. कपोतालीवर असलेल्या मुख्य शिखरांच्या प्रतिकृती, मंडोवरावर असलेल्या देवकोष्ठावरील शिखरे यावरुन मुळात हे मंदिर शिलाहार शैलीचे सप्तरथ भूमिज मंदिर असावे.[४७]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## निष्कर्ष

खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर हे नागर शैलीतील भूमिज या उपशैलीत बांधलेले असून नगारखाना, स्वर्गमंडप, सभामंडप, अंतराळकक्ष, गर्भगृह हे मंदिराचे प्रमुख विभाग आहेत.

कोपेश्वर मंदिराच्या स्थापत्य वैशिष्ट्यामध्ये कोपेश्वर मंदिराचा गजथर महत्त्वाचा ठरतो. कारण अधिष्ठानात गजथराची रचना अशा पद्धतीने केली आहे की, जणू गजथरातील सर्व हत्तींनी मंदिराचा सर्व भार आपल्या पाठीवरती तोलून धरला आहे. या मंदिराचे छत हे उक्षिप्त प्रकारचे आहे. मंदिराच्या द्वारशाखेमध्ये पंचशाखा आहेत. म्हणजेच मंदिराच्या उत्तर, दक्षिण व पूर्व प्रवेशद्वारासाठी 'नंदिनी' या उत्तम द्वारशाखेचा वापर करण्यात आला आहे. कोपेश्वर मंदिराचे मूळ शिखर सध्या अस्तित्वात नाही. कोपेश्वर मंदिर स्थापत्यावर यादव तसेच सोळंकी शैलीचा प्रभाव जाणवतो. स्तंभावर असणारा उलटा नाग हा यादवांचा प्रभाव दाखवतो. या मंदिरातील छताची रचना ही करोटक पद्धतीशी साम्यता दर्शवते. करोटक पद्धत ही सोळंकी शैलीशी निगडीत असून कोपेश्वर मंदिरावरील सोळंकी शैलीच्या प्रभावाची ती निदर्शक आहे.

अशा रितीने वेगवेगळ्या शैलींच्या मिश्रणातून मजबूत व उत्कृष्ट स्थापत्यरचना कोपेश्वर मंदिराच्या स्थपितींनी साधली आहे.

□□□

## संदर्भसूची आणि तळटीपा

१) Bhattacharaya Tarapada, A study on Vastuvidya of The cannons of Indian Art, Firma Mukhopadhyay, Second Edition, 1963, Kolkatta, Page.

२) काळे भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड प्रकाशन, पुणे, २००९, पृ.५.

३) Sairam T.V. Indian Temple form and Foundation, Agamkala Prakashan, Delhi, 1982, P.22.

४) प्रा. कठारे अनिल, प्रा. साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा प्रकाशन, नांदेड, २००८, पृ.११.

५) प्रा. वाजपेयी कृष्णदत्त, गद्रे प्रभाकर, भारतीय वास्तूकलेचा इतिहास, पृ.२.

६) जामखेडकर अ.प्र., महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ, खंड-१, भाग-२, स्थापत्य व कला, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ.११९.

७) कित्ता, पृ. १२०.

८) Sairam T.V., Op.cit., page. 23.

९) डॉ. कुलकर्णी र. पु., कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००४, पृ.८७.

१०) Devakrishna, Temples of North India, National Book Trust, Delhi, 1965, page. 5.

११) जामखेडकर अ.प्र., उपरोक्त, पृ. १३७.

१२) पाध्ये केशव आप्पा, हेमाद्रि उर्फ हेमाडपंत यांचे चरित्र, वरदा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००८, पृ. १६४.

१३) जामखेडकर, अ.प्र., उपरोक्त, पृ.१३८.

१४) प्रा. वाजपेयी कृष्णदत्त, गद्रे प्रभाकर, उपरोक्त, पृ.४.

१५) Benjamin Rowland, The Art and Architecture of India & Budhist, Hindu, Jain, Penguin Book Ltd., Australia, Reprint 1956, page. 156.

१६) प्रभुदेसाई योगेश, कोल्हापूरातील मंदिरसंपदा, अक्षर दालन प्रकाशन, २००१, पृ.१९.

१७) प्रा. वाजपेयी कृष्णदत्त, गद्रे प्रभाकर, उपरोक्त, पृ.४.

१८) प्रा. चव्हाण उदाजी, खजुराहोची मंदिर शिल्पे, आनंद प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर, १९८२, पृ.२२.

१९) माटे म. श्री., प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७४, पृ. ८१.

२०) प्रभुदेसाई योगेश, उपरोक्त, पृ. ८०.

२१) कित्ता, पृ. ८१.

२२) माटे, म.श्री., प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७४, पृ. ९१.

२३) जामखेडकर, अ.प्र., उपरोक्त, पृ.१६०.

२४) Archaological survey of Kolhapur State, 1870-1888.

२५) कमल बस्ती

बेळगावमध्ये उत्तर चालुक्य काळातील दोन बस्ती आहेत. त्यापैकी एक म्हणजे कमल बस्ती रट्ट राजघराण्यातील कार्तीवीर्य (IV) याचा मंत्री बिचन किंवा बीचराज याने इ.स. १२०४ मध्ये ही कमल बस्ती बांधली. कमलबस्तीच्या गर्भगृहात नेमीनाथांची मूर्ती आहे. बस्तीमधील सर्वात लक्षवेधक विभाग म्हणजे बस्तीचा मुखमंडप. ह्या मुखमंडपाचा तलविन्यास षटकोनी आहे. मुखमंडपात कक्षासनही आहे. छताला मध्यभागी कमळाच्या आकाराची लोंबती नक्षी आहे. त्यामुळे या बस्तीला कमलबस्ती असे नाव मिळाले. छतावर आठ बाजूला अष्ट दिकपालांच्या प्रतिमा आहेत. (Ref. Suryanath U. Kamath (Edition), Belgum District Gazeteer, Banglore, 1987, Page 863)

२६) Kundangar K.G., The Archaelogical remains in the Kolhapur State, an artical published in "Rajaramain" Golden juble memorial Vol. 1931, Page. 67.

२७) कळसेकर, टी.एल., महाराष्ट्राचे खजुराहो : खिद्रापूर, काळशेखर प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. २९.

२८) किरणोत्सवावेळी दि. ६ मे २०१२ रोजी प्रत्यक्ष स्थल भेट.

२९) कळसेकर, टी.एल.उपरोक्त, पृ.३०.

३०) Benjamin Rowland, Op. cit., page- 168.

३१) कि.का. चौधरी (संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन १९८९, पृ. ६७२.

३२) कळसेकर टी.एल., उपरोक्त, पृ. ३६.

३३) तसू – तसू म्हणजे 'गज' चा २४ वा भाग. गज म्हणजे २ फूट. (∴ १ तसू = १ इंच) (मोल्सवर्थकृत इंग्रजी–मराठी शब्दकोश, शुभदा सारस्वत, पुणे, पृ. ३७०.

३४) कोल्हापूर पुराभिलेखागारामधील १७ जुलै १८७९ सालची मोडी कागदपत्रे.

३५) Deshpande Suresh Raghunath, Yadav Sculpture (Western Maharashtra : 1000 AD to 1400 AD, B.R. Publishing Corporation, Delhi, page. 26 & 27.

३६) Heritage India August 09 to Octomber 09, Vol-2, Page - 55, (artical by G.B. Deglurkar)

३७) Ibid, Page - 55.

३८) Parsy Brawn, Indian Architecture (Budhist and Hindu Period) The Raraporewala sons and co private Ltd., Mumbai, Fifth Edition, 1965.

३९) कुलकर्णी र.पु., सुत्रधार मंडन विरजित प्रासाद मंडन, मराठी भाषांतर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. ११५.

४०) **करोटक पद्धत**

सोळंकी शैलीतील करोटक पद्धतीमध्ये छत गोल घुमटाकार असते. त्यांना खालून अष्टकोनी खांब आधार देतात. घुमटाकार छताला आतून गोल नक्षीदार वर्तुळे असतात. ही वर्तुळे मधल्या शिरोभागाकडे लहान-लहान होत जातात आणि अखेरच्या केंद्रबिंदूजवळून एखादा लहानसा नक्षीदार लोलक खाली लोंबत असतो. (कृष्णदेव : उत्तर भारतातील मंदीरे, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, १९६९, पृ. ४७)

४१) Deshpande Suresh Raghunath, Op.cit., page - 87.

४२) Ibid, page - 83.

४३) कुलकर्णी र.पु., सूत्रधार मंडन विरजित प्रासाद मंडन, उपरोक्त, पृ. ५७.

४४) Dr. G. Sethuraman, Facts of Indian Art and Culture, J.J. Publication, Madurai, 1995, page. 71.

४५) Benjamin Rowland, Op.cit., page 155.

४६) प्रभुदेसाई योगेश, उपरोक्त, पृ. १७.

४७) जामखेडकर, अ.प्र., उपरोक्त, पृ. १६६.